ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 2 | OCTOBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ‘चंदेरी दुनियेत’ या आत्मचरित्रातील खलप्रवृत्तीच्या व्यक्तीरेखा : एक दृष्टीक्षेप




व्यंकट बाबूराव सूर्यवंशी
संशोधक विद्यार्थी

## प्रास्ताविक :

‘चंदेरी दुनियेत’ हे लीला चिटणीस यांचे आत्मचरित्र आहे. कंगन, बंधन व झूला या चित्रपटातील त्यांच्या भूमिका महत्वाच्या ठरल्या. १९४० च्या दशकातील एक आघाडीची नायिका म्हणून लीला चिटणीस या लोकप्रिय होत्या.

लीला चिटणीस यांचा जन्म कर्नाटकातील ‘धारवाड’ येथे झाला असून त्यांचे वडील मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत पूर्ण झाले. मारवाडी गर्ल हायस्कूल मध्ये शिक्षिकेची नोकरी केली. त्यांनी बालपणाची आठवण सांगताना, ‘‘पदोपदी मला हटकल जाई, लीली, खबरदार इतक्या मोठ्यानं हसली तर, मुलीनं नाजूक हसलं पाहिजे, लाज शरम नाही का तुला? मुलगा नाहीस तू.’’ यावरूनच त्यांच्या घरातील वातावरणाची कल्पना करता येते. मुलगा व मुलगी असा भेदाभेद दिसतो.

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच डॉ.गजानन यशवंत चिटणीस यांच्या प्रेमात पडल्या आणि घरातून विवाहाला विरोध असताना सुद्धा लीला यांनी चिटणीसांबरोबर विवाह केला. डॉ.चिटणीस हे व्यवसायाने डॉक्टर असून समाजसुधारणा व धर्मसुधारणा यामध्ये स्वत:ला वाहून घेऊन ते ब्राह्मो समाज व प्रार्थना समाजाचे कार्य करीत होते. चिटणीसांशी विवाह झाल्यानंतर चार मुले व नोकरी यात लीलाबाईंची शारीरिक व मानसिक ओढातान होत असल्यामुळे त्यांच्या वैवाहिक व कौटुबिक जीवनामध्ये आनंद नसणे व डॉक्टरांचे मनमानी वर्तन यामुळे कुचंबणा सहन करावी लागत असल्यामुळे त्यांनी घर—संसार चालविण्यासाठी इंग्रजी शाळेत नोकरी केली. डॉक्टरांबरोबर वैवाहिक जीवनाची वाटचाल चालू असतानाच त्यांच्या कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटल्यामुळे त्यांना नाटक व चित्रपटसृष्टीकडे वळावे लागले. म्हणजेच आर्थिक निकड यामुळेच क्षेत्रात प्रवेश झाला आहे.

डॉक्टरांच्या ओळखी वरूनच नाट्यमन्वंतर संस्थेच्या उसना नवरा या नाटकात मालकतीची भूमिका मिळाली. याबरोबरच आंधळ्याची शाळा, उसना नवरा, लपंडाव, तक्षशिला या नाटकातूनही त्यांनी काम केले आहे. लीलाबाईला अभिनय व कलेचे शिक्षण केशवराव दाते यांनी दिले. चित्रपट सृष्टीतील कार्य १९३५ मध्ये धुवाधार त्यांनी अभिनय केलेला पहिला चित्रपट. जेव्हा त्यांनी हा चित्रपट पाहिला तेव्हा स्वत:ला त्यांनी केलेले काम आवडले नाही. तेव्हा अभिनय विषय पुस्तक वाचून अभिनयाचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी प्रयत्न केले.

## लीला चिटणीसांनी भूमिका केलेले चित्रपट :

वहाॅ, जंटलमन, डाकू, इन्साफ, जेलर, कंगन, बंधन, झुला १९३९, आझाद, कंचन, शतरंज, माॅ, एक होता राजा, नया घर नया दौर, ढोल का फोन, गंगाजमुना, प्रेम आंधळ असतं १९६१, असली—नकली, शहाणा आहे, आधी कळस मग पाया, जिंदगी (मद्रासी), गाईड (इंग्रजी), वक्त, जिंदगी, गाईड प्रिन्स, गुनाहोंके देवता, इंतकाम, दुल्हन एक रात की, औरत, मोहब्बत किसको कहते है, दोस्ती, पूजा के फूल, कालाबाजार, मनमौजी, पलको की छाव मे, जीवनमृत्यू, राजू तो मै दिवाना इ.चित्रपटातून अभिनय केला.

मराठी, हिंदी, इंग्रजी व मद्रासी चित्रपटातून काम केले आहे. लीला चिटणीस यांनी देवानंद, धर्मेंद्र, राजेश खन्ना, दिलीप कुमार, राज कपूर इ. अभिनेत्याबरोबर उत्कृष्टरित्या काम केले आहे. आज की बात १९५५ व पाहू रे किती वाट १९६३ या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. चित्रपट सृष्टीतून निवृत्त झाल्यावर पून्हा रंगभूमीत काम केले. एक रात्र अर्धा दिवस या नाटकाचे लेखन करून प्रयोग केले.

लीला चिटणीस यांनी आत्मचरित्रातून कला जीवनाबरोबर, गृहिणी, आई, नोकरी करणारी स्त्रीचे होणारे हाल व संघर्ष किती सहन करावे लागतात हे त्यांनी आत्मचरित्रामध्ये सांगितले आहे. लीला चिटणीसांनी आपल्या आत्मचरित्रातून कौटुंबिक व खाजगी जीवनाचे चित्रण केले आहे. तसेच कलाजीवनातील वाटचालीचे अनुभवन सांगितले आहेत. यांच्या आत्मचरित्रातून चरित्रात्मक माहिती कमी आली असून जीवनावर प्रकाश टाकले असून स्वअस्तित्वाचा वेध घेताना आत्मचरित्रातून अनेक पुरूष प्रतिमा आलेल्या आहेत. त्याचा आपण या ठिकाणी वेध घेणार होत.

### १) डॉ.चिटणीस :

कॉलेजमध्ये शिकत असताना विधूर विद्वान, लेखक, संपादक धर्मप्रचारक असून शैक्षणिक दर्जा उच्च असलेल्या व्यक्तीसोबच लीलाबाईचे प्रेम जडले यातूनच विवाह करतात. मात्र लिलाबाईच्या घरातून या विवाहाला विरोध होतो. जेव्हा लिलाबाई आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा आई लग्नाला मान्यता देते. लिलाबाईचे डॉक्टरांसोबत संसारिक जीवन जास्त काळ टिकत नाही. पतीच्या विद्वत्तेसमोर आपण परिपक्व आहोत ही खंत लिलाबाईना हमेशा बोचत असते. डॉ.चिटणीस प्रगल्भ व समजदार व्यक्ती होते. मा.विनायक यांच्या पत्रावरून लिला चिटणीस व डॉक्टर यांच्या संसारात संघर्षाची ठिणगी पडते. तरी डॉक्टर लिलाबाईना समजून घेताना दिसतात. लिलाबाई खोटे सांगून मा.विनायकांना भेटत असतात. तेव्हा डॉक्टर कायमचे घर सोडून जातात. कारण लिलाबाई खालच्या जातीच्या माणसाशी मा.विनायकांच्या भावाशी संबंध ठेवल्यामुळे संतापतात.

### २) मा.विनायक :

मा.विनायक मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय नट होते. त्यांचे लिलाबाईवर प्रेम जडते. ते पत्र लिहून लिलाबाईना कळवतात आणि यांच्या भेटीमुळेच लीला चिटणासाच्या संसाराची वाताहत सूरू होते आणि डॉ.चिटणीस घर सोडून जातात. जेव्हा लीला चिटणीस एकट्या राहतात, तेव्हा मात्र मा.विनायक यांच्यासोबत अंतर ठेवण्याचा प्रयत्न करतात. लीला चिटणीसांकडे एक प्रेमिका म्हणून व अभिनेत्री म्हणूनही सहकार्याने वागताना दिसत नाहीत. यांच्यासमोरच दुसऱ्या अभिनेत्रींच्यासोबत प्रणय चाळे करत असतात. लीला चिटणीसांना साध्या भूमिका देऊन या चित्रपट क्षेत्रातील पुरूष प्रधान विचारसरणीचे प्रतिनिधित्व करणारे आहे. एकूणच मा.विनायक यांनी लिला चिटणीसाची उपेक्षाच केली आणि असल्या अविश्वासू माणसासाठी अभिनेत्रीने आपला पती व संसार गमावला आहे.

### ३) गुली :

गुली हे पारसी चित्रपट वितरक होते. त्यांनी लीला चिटणीसांना कौंटुबिक आधारासाठी पुरूषाची गरज आहे हे कळताच गुली हा लीला चिटणीसांसोबत विवाह करू इच्छितो आणि सुरूवातीला विवाहहोईपर्यंत चांगले वागतो आणि नंतर आपले खरे रूप दाखवत असतो. लीला चिटणीसांनी

विम्यासाठी दिलेले पैसे हडपणे. दारू पिऊन शिवीगीळ करणे, छळ करणे यामुळे वारंवार घर बदलावे लागते. या गुलीकडून लीला चिटणीस एक मुलाला जन्माला घालतात. याच दरम्यान लिला चिटणीसाच्या संपर्कात एक चंद्रशेखर नावाचा वैमानिक येतो व त्याच्यासोबत संबंध निर्माण झाल्यामुळे आपले संबंध संपविण्यासाठी गुली हा पेशाने व्यावसायिक असणारा या ठिकाणीही पैसे घेऊन संबंध संपवतो. अशी मानसिकता असणारे पुरूषाचे चित्रण चंदेरी दुनियात आत्मचरित्रातून आलेले आहे.

## ४) चंद्रशेखर आर्य :

लिला चिटणीस यांच्यापेक्षा वयाने लहान असणारा युवक पेशाने वैमानिक असणारा अभिनेत्रीच्या आकर्षणापोटी तो लिला चिटणीसांसोबत राहण्याचे मान्य करतो. पण मुलांना सोबत घ्यायला नकार देत असतो आणि यावरूनच त्यांचा विवाह होत नाही. लिलाबाईचे चित्रपटसृष्टीत काम करणे हे ही त्याला आवडत नाही. यामुळे त्यांचे चित्रपटसृष्टीत वावरणे कमी होत असते. याच काळात लीला चिटणीसांना मुलांसह एक डच गृहस्थ स्विकारण्यास तयार होतो तेव्हा हा विरोध करतो आणि काही दिवसानी लिला चिटणीसाला न सांगता तो विवाहबद्ध होतो.

## ५) लीला चिटणीसांचा मुलगा व भाऊ :

मुलगा अजित हा ग्वाल्हेर येथे 'सिंधिया हायस्कूल' मध्ये शिक्षक असतो. शिक्षणात हा हुशार असतो. शाळेतील मुले तुझी आई चित्रपटात काम करते आणि त्या वेश्या असतात असे म्हणून चिडवत असतात. तो ग्वाल्हेर सोडून मुंबईला माहिमच्या स्कॉटिश स्कूलमध्ये येतो. मोठा झाल्यावर तो एका मेरी नावाच्या मुलीकडून फसवला जातो आणि यातून बाहेर पडण्यासाठी नशापान करत असतो. लग्न झाल्यानंतर तो अर्धांगिनीच्या सहवासात आल्यावर तो सुधारतो. मोहन नगरकर हा लीला चिटणीसांचा भाऊ. हा लिला चिटणीसांना हमेशा मदत करत असतो आणि जेव्हा जेव्हा या अडचणीत असतो, तेव्हा आधार देण्याचे काम करतो.

या ठिकाणी आलेले सर्व पुरूष, मुलगा व भाऊ मोहन नगरकर सोडून हे पुरूषी मानसिकतेचे असून स्त्री म्हणून तिच्यासोबत राहणे पसंद करतात आणि लीला चिटणीस याठिकाणी आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी समाजाची बंधने झुगारून विवाहबाह्य संबंध ठेवून एखादा पुरूष जोडीदार मिळेल आणि आपल्याला सुखात राहता येईल. पण तसे न होता प्रत्येक पुरूषाकडून फसवणूक केली जाते आणि स्त्री ही उपभोगाची वस्तु म्हणून पाहतात असे दिसते. समाजव्यवस्थेत, चित्रपटसृष्टीत एक स्त्री म्हणून स्त्रीचे, अभिनेत्रीचे होणारे शोषण, फसवणूक या निमित्ताने पुढे आल्याचे दिसते. याबरोबरच लीला चिटणीस यांच्या मुक्त जीवन जगण्याच्या निर्णयामुळे आयुष्याची परवड झालेली असून या अनैतिक वागण्यामुळे तसेच अधिक पुरूषांशी संबंध यामुळे त्यांना कुटुंबापासून दूर घेऊन जाताना दिसते आहे.

## संदर्भ :

१. चंदेरी दुनियेत, चिटणीस लीला, श्री विद्या प्रकाशन, पुणे ३०, १९९०,
२. रा.ग.जाधव, मराठी विश्वकोश, खंड १.२, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, प्रकाशित
३. The Concise Oxford Dictionary of English Literature by London (2nf.0), 1970,
४. चरित्र—आत्मचरित्र विशेषांक, महाराष्ट्र साहित्य परिषद.
५. सदा कऱ्हाडे, चरित्र—आत्मचरित्र, लोकवाङ्मयगृह, मुंबई.